दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com
सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २५० वा | गुरुवार, दि. १४ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827




# जिल्ह्याच्या विकासाला वेग; गडकरींच्या हस्ते आज चार महामार्गांचा शुभारंभ





**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यासह अक्कलकोट तालुक्याच्या दळणवळण, औद्योगिक आणि आर्थिक विकासाला नवी गती देणाऱ्या विविध राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांच्या भूमिपूजनाचा भव्य सोहळा गुरुवार, १४ मे रोजी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पार पडणार आहे. अक्कलकोट येथील नवीन बसस्थानक परिसरात सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमासाठी जिल्हा प्रशासन, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि स्थानिक यंत्रणांकडून युद्धपातळीवर तयारी सुरू करण्यात आली आहे.

या कार्यक्रमात तब्बल १७१ किलोमीटर लांबीच्या आणि सुमारे २ हजार ७८४ कोटी रुपयांच्या विविध राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचा शुभारंभ केला जाणार असून, या प्रकल्पांमुळे अक्कलकोट तालुका राष्ट्रीय स्तरावरील दळणवळण व्यवस्थेशी अधिक सक्षमपणे जोडला जाणार आहे. व्यापार, उद्योग, पर्यटन आणि कृषी वाहतुकीस मोठी चालना मिळणार असल्याने या भूमिपूजनाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सूरत-चेन्नई ग्रीनफिल्ड एक्सप्रेस वे अंतर्गत महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या नाशिक-अक्कलकोट महामार्गासह वागदरी-अक्कलकोट-तोळणूर, मोहोळ-बसवनगर-वळसंग आणि इतर महत्त्वाच्या मार्गांचा या प्रकल्पांमध्ये समावेश आहे. हे महामार्ग पूर्ण झाल्यानंतर उत्तर महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र तसेच कर्नाटक सीमावर्ती भागाशी संपर्क अधिक गतिमान होणार आहे.

देशातील महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेला सूरत-चेन्नई ग्रीनफिल्ड एक्सप्रेस वे गुजरातमधील सूरतपासून तामिळनाडूतील चेन्नईपर्यंत जाणारा असून महाराष्ट्र, कर्नाटक आणि





आंध्र प्रदेश या राज्यांना जोडणार आहे. या महामागार्मुळे मुंबई-पुणे मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार असून प्रवासाचा वेळही लक्षणीयरीत्या घटणार आहे. विशेषतः नाशिक-अक्कलकोट मागार्मुळे राज्यातील उत्तर आणि दक्षिण भागातील संपर्क अधिक वेगवान होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

कार्यक्रमात हसापूर ते बडदाल राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १५०(सी) या मार्गाच्या ग्रीनफिल्ड अलाईनमेंट सहापदरीकरणाच्या १५५२ कोटी रुपयांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा समावेश आहे. याशिवाय वागदरी-अक्कलकोट-तोळणूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८(बी) चे पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरण, मोहोळ-बसवनगर-वळसंग राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४६५ चे दुपदरीकरण, दुधनी येथील रेल्वे उड्डाण पूल, राष्ट्रीय महामार्ग १५०-ई चे ९७ कोटी रुपयांचे उन्नतीकरण आणि दर्जोन्नतीकरण, तसेच बोरी-उमरगे येथे बोरी नदीवरील २६ कोटी रुपयांच्या मोठ्या पुलाच्या बांधकामाचा समावेश करण्यात आला आहे.

वागदरी-अक्कलकोट आणि अक्कलकोट-तोळणूर मागार्मुळे कर्नाटक सीमावर्ती भागाची जोडणी अधिक मजबूत होणार आहे. तर मोहोळ-वळसंग हा मार्ग सोलापूर जिल्ह्यासाठी बाह्यवळण रस्ता म्हणून महत्त्वपूर्ण ठरणार असून शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यास मोठी मदत होणार आहे. यामुळे औद्योगिक वाहतूक सुलभ होण्याबरोबरच ग्रामीण भागातील बाजारपेठांनाही नवे दळणवळणाचे पर्याय उपलब्ध होणार आहेत.

या महामार्गांसाठी हजारो कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे प्रकल्प मार्गी लागल्याचा दावा समर्थकांकडून करण्यात येत आहे. भूमिपूजन सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात असून अक्कलकोट शहरात स्वागत कमानी, बॅनर आणि विविध तयारीला वेग आला आहे.

या कार्यक्रमाला सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे प्रमुख उपस्थित राहणार असून माजी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खासदार प्रणिती शिंदे, माजी आमदार सुभाष देशमुख, आमदार विजय देशमुख, धैर्यशील मोहिते- पाटील , डॉ. ज्योती वाघमारे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या महामार्ग प्रकल्पांमुळे सोलापूर जिल्ह्याच्या विकासाला नवे बळ मिळणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# मंत्री-अधिकाऱ्यांचे विदेश दौरे रद्द, विशेष विमान आणि हेलिकॉप्टर वापरावरही अटी



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राच्या राजकारणातील आताच्या घडीची मोठी बातमी समोर आली आहे. जागतिक तेल संकटाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी आपल्या मंत्रिमंडळासाठीच 7 मोठे निर्णय घेतले आहेत. मुख्यमंत्र्यांनी उच्च स्तरीय बैठकीय या निर्णयांची घोषणा केली. या निर्णयांमुळे आता मंत्र्यांकडून वापर केल्या जाणाऱ्या विविध सुविधांवर परिणाम होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबाबत केलेल्या आवाहनानंतर मुख्यमंत्र्यांनी याबाबतचे निर्णय घेतले आहेत. इंधन आणि परकीय चलन बचतीच्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या (पान 2 वर..)

### या बैठकीत जे प्रमुख निर्णय घेण्यात आले, ते पुढीलप्रमाणे...

1. मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या ही तत्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणण्यात यावी. बाहेरच्या प्रवासात असताना ताफ्यातील वाहनांची संख्या निर्धारित संख्येपेक्षा अधिक नसेल याची जबाबदारी संबंधित पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक यांची असेल.
2. मंत्री-अधिकार्यांनी कोणतेही विदेश दौरे करु नयेत.
3. मंत्र्यांनी अत्यावश्यक नसेल तेव्हा शासकीय विमान, हेलिकॉप्टर यांचा वापर करु नये, त्याऐवजी नियमित विमानसेवेचा वापर करावा.
4. मंत्री-अधिकारी यांनी आवर्जून मेट्रो आदी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवावा. पहिल्या टप्प्यात किमान एक दिवस असा प्रयोग करावा.
5. अधिकाऱ्यांना बैठकांना बोलावण्याऐवजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठका घ्याव्यात.
6. शासनात वितरित करण्यात आलेल्या वाहनांचा कोटेकोरपणे आढावा घेण्यात यावा.
7. ऊर्जा बचतीसाठी अनावश्यक होर्डिंग्ज/फ्लेक्सवरील कारवाई वाढवण्यात याव्यात आणि तेथे डेकोरेटिव्ह लायटिंगचा वापर होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी.



संपादकीय

# पुन्हा पेपर लीक

या देशात विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी गेल्या अनेक वर्षांपासून मोठा खेळ सुरू आहे, पण तो सरकारने कधीच गांभीर्याने घेतलेला नाही. विविध स्तरावरच्या प्रवेश परीक्षा पेपरफुटीमुळे आता एक पोरखेळ बनला असून शिक्षण व्यवस्थेवरचा विश्वासच उडावा अशी सध्याची परिस्थिती आहे.

वैद्यकीय प्रवेश परीक्षेसाठी महत्त्वाची असलेली नीटची परीक्षा रद्द करण्यात आली आहे. त्यासाठी पुन्हा पेपरफुटीचे कारण देण्यात आले असून देशभरातील सुमारे 22 लाख विद्यार्थ्यांना आता पुन्हा ही परीक्षा द्यावी लागणार आहे. 3 मे रोजी ही परीक्षा झाली होती. त्यानंतर विद्यार्थी आपापल्या गावी परतले होते आणि पालकांनीही सुटकेचा निःश्वास टाकला होता.

या परीक्षेच्या तयारीसाठी या विद्यार्थ्यांनी गेले सुमारे वर्षभर कसून अभ्यास केला होता. पण आता पुन्हा एकदा त्यांचे भवितव्य पेपरफुटीमुळे टांगणीला लागले आहे. यंदाची ही रद्द झालेली परीक्षा पुन्हा घ्यावी लागणार आहे, आता ती पुन्हा कधी घेतली जाणार आहे याविषयी सरकारकडून किंवा संबंधित अधिकार्यांकडून कोणतीच माहिती दिली गेलेली नाही. त्यामुळे लाखो विद्यार्थी आणि त्यांचे पालक पुन्हा हवालदिल झाले आहेत.

पेपरफुटीचे हे प्रकार देशपातळीवर तसेच राज्य पातळीवर वारंवार होताना दिसतात. एका आकडेवारीनुसार, गेल्या दहा वर्षांत किमान 90 प्रवेश परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द कराव्या लागल्या आहेत. पेपरफुटीचा हा प्रकार राजकीय पातळीवरही खूप गाजला होता आणि त्यातून भाजप सरकारवर सातत्याने चौफेर टीका केली जात होती.

सरकारकडून दर वेळेला या पुढील काळात असे होणार नाही आणि असे प्रकार करणार्यांच्या विरोधात सरकार कठोर कारवाई करेल वगैरे आश्वासने दिली गेली आहेत. खुद्द पंतप्रधानानी मागे एकदा संसदेत नीट परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणात सरकार गांभीर्याने उपाययोजना करेल असे आश्वासन दिले होते. पण या गांभीर्याच्या उपाययोजना नेमक्या कोणत्या स्वरूपाच्या होत्या हे कधीच कोणाला कळले नाही. याआधी 2024 मध्ये नीट परीक्षेचे पेपर फुटले होते, त्यानंतर देशभर आरडाओरडा झाल्यानंतर मधली एक परीक्षा सुरळीत पार पडली आणि आता पुन्हा एकदा पहिले पाढे पंचावन्न असे घडले आहे. या पेपरफुटीचे महाराष्ट्र कनेक्शन समोर आले असून नाशिकमधून या संबंधात एकाला ताब्यात घेण्यात आले आहे. हरियाणातून हा पेपर फुटला आणि तो मुख्य परीक्षेच्या 48 तास आधी देशाच्या विविध भागांत लाखो रुपये किमतीला विकला गेला असे सांगितले जात आहे. विद्यार्थ्यांचे भवितव्य ज्याच्यावर अवलंबून आहे आणि देशाचे भवितव्यही ज्या विद्यार्थ्यांशी निगडित आहे त्या विद्यार्थ्यांपुढे हा सगळा पैशाचा खेळखंडोबा सुरू असताना देशात आता कोणत्या व्यवस्थेवर विश्वास ठेवायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. मधल्या काळात विविध राज्यांच्या लोकसेवा आयोगाचे पेपर फुटण्याचेही प्रकार घडले होते. त्यामुळे तो ठिकठिकाणी निवडणुकीच्या प्रचाराचाही मुद्दा ठरला होता.

इतकी सगळी आरडाओरड होऊनसुद्धा आणि विद्यार्थी संघटनांकडून सातत्याने या प्रकरणात आवाज उठवूनसुद्धा परिस्थितीत कोणताही बदल झालेला दिसला नाही. आज रद्द करण्यात आलेली नीटची परीक्षा नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून घेण्यात आली होती. या पेपरफुटीत या एजन्सीची काही जबाबदारी आहे की नाही हा प्रश्न आता खडसावून विचारण्याची वेळ आली आहे.

नीट सारख्या महत्त्वाच्या परीक्षा काटेकोरपणे घेण्यासाठी जर एक स्वतंत्र एजन्सी नेमण्यात आली असेल तर त्या एजन्सीने आपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे अपेक्षित असते; परंतु या एजन्सीच्या पातळीवरच काही गैरप्रकार होत आहे का, याची चौकशी आता व्यापक प्रमाणात करावी लागेल. सरकारने हे प्रकरण हलक्यात घेऊन चालणार नाही. देशात स्वतंत्र शिक्षण खाते अस्तित्वात असताना या शिक्षण मंत्रालयानेही अशा प्रकारच्या प्रवेश परीक्षांच्या बाबतीत अधिक जागरूकपणे उपाययोजना करायला हवी. विद्यार्थी अशा परीक्षांसाठी किती काबाडकष्ट करतात आणि त्यांचे पालक किती कष्ट उपसतात याचा एकदा सरकारने स्वतंत्र अभ्यास केला पाहिजे, त्याशिवाय त्यांनाही या परीक्षेचे महत्त्व कळणार नाही.

विविध राज्यांच्या राज्य लोकसेवा आयोगातर्फे सरकारी अधिकारी भरतीसाठी ज्या परीक्षा घेतल्या जातात तोही एक प्रकारचा तमाशा होऊन बसला आहे. सर्रास बोली लावून या परीक्षांचे पेपर आधीच मिळवण्याचे प्रकार ठिकठिकाणी घडत आहेत. अनेक वेळा प्रामाणिकपणे या परीक्षा उत्तीर्ण होऊनही निकालासाठी विद्यार्थ्यांना दीर्घकाळाची प्रतीक्षा करावी लागते. कधीकाळी निकाल हाताशी आला तरी प्रत्यक्ष सरकारी सेवेतील नियुक्तीसाठी दोन-चार वर्षांची प्रतीक्षा त्यांना करावी लागते. एकूण काय तर विद्यार्थ्यांची आज चारही बाजूने कोंडी होताना दिसत असून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी होणारी ही छेडछाड देशाला महागात पडणारी आहे. निदान आज घडलेल्या प्रकारानंतर तरी या पुढील काळात देशातील नीट सारख्या परीक्षा तरी व्यवस्थितपणे पार पडतील याची काळजी सरकारला घ्यावी लागेल. सगळेच रामभरोसे सोडून चालणार नाही.

# छत्रपती संभाजी महाराज : पराक्रमाचे तेजस्वी प्रतीक

मराठ्यांच्या इतिहासात शौर्य, पराक्रम, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेची असंख्य तेजस्वी उदाहरणे आढळतात. या परंपरेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून भारतीय इतिहासात अभूतपूर्व कार्य केले. मात्र या स्वराज्याचे रक्षण करताना आपल्या प्राणांची आहुती देणारे, संकटांना न डगमगता सामोरे जाणारे आणि मृत्यूला देखील हसत स्वीकारणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे छत्रपती संभाजी महाराज होय. १४ मे हा दिवस छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका राजाचा जन्मदिन नसून स्वाभिमान, विद्वत्ता आणि अपराजित धैर्य यांच्या स्मरणाचा दिवस आहे.

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. त्यांचे बालपण हे अत्यंत संघर्षमय आणि आव्हानात्मक परिस्थितीत गेले. त्यांचे वडील छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य उभारणीच्या कार्यात सतत व्यस्त होते, तर माता सईबाईंचे निधन संभाजी महाराज लहान असतानाच झाले. त्यामुळे त्यांचे संगोपन जिजाऊ मातांच्या संस्कारांत झाले. जिजाऊंच्या सान्निध्यात त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम, शौर्य आणि न्यायप्रियता यांचे संस्कार रुजले. बालपणापासूनच संभाजी महाराज अत्यंत बुद्धिमान, पराक्रमी आणि अभ्यासू होते. त्यांना अनेक भाषा अवगत होत्या. संस्कृत, फारसी, मराठी, हिंदी आणि पोतुर्गीज भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी अल्पवयातच ‘बुधभूषण’ हा संस्कृत ग्रंथ लिहिला. यावरून त्यांच्या विद्वत्तेची कल्पना येते.

संभाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्व केवळ योद्ध्याचे नव्हते, तर ते एक कुशल प्रशासक, अभ्यासू साहित्यिक आणि दूरदृष्टी असलेले राजकारणी होते. त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंग हे संघर्ष आणि कटकारस्थानांनी भरलेले होते. आग्रा येथे औरंगजेबाच्या कैदेतून सुटका करताना त्यांनी दाखवलेले धैर्य उल्लेखनीय होते. शिवाजी महाराजांसोबत त्यांनी संकटांना सामोरे जात स्वराज्याचे धडे घेतले. बालवयातच त्यांनी युद्धकला, राजकारण आणि प्रशासन यांचे शिक्षण घेतले. त्यामुळे पुढे राज्यकारभार सांभाळताना त्यांना अनेक अनुभवांचा उपयोग झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर स्वराज्यावर मोठे संकट आले. अंतर्गत राजकीय मतभेद आणि बाह्य शत्रूंचे आक्रमण अशा कठीण परिस्थितीत संभाजी महाराजांनी स्वराज्याची धुरा सांभाळली. १६८१ मध्ये त्यांचा राज्याभिषेक झाला आणि त्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. त्यांच्या कारकिदीर्चा काळ हा अत्यंत संघर्षमय होता. मुघल सम्राट औरंगजेबाने दक्षिणेत उतरून मराठ्यांचे राज्य संपविण्याचा निर्धार केला होता. त्याच वेळी सिद्दी, पोतुर्गीज आणि इंग्रज यांच्याशीही संघर्ष सुरू होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी धैर्याने आणि चातुर्याने शत्रूंना तोंड दिले.

संभाजी महाराज हे अत्यंत पराक्रमी सेनानी होते. त्यांनी अनेक युद्धांमध्ये आपल्या नेतृत्वाचे दर्शन घडवले. त्यांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने मुघलांना वारंवार पराभूत केले. औरंगजेबासारख्या बलाढ्य सम्राटालाही संभाजी महाराजांचे सामर्थ्य जाणवले होते. त्यांनी आपल्या सैन्याला प्रेरणा देत स्वराज्य टिकवून ठेवले. त्यांच्या युद्धनीतीमध्ये वेग, गनिमी कावा आणि अचूक नियोजन यांना विशेष महत्त्व होते. मराठा सैन्याची ताकद वाढविण्यासाठी त्यांनी अनेक उपाययोजना केल्या. १६८९ मध्ये संगमेश्वर येथे आपल्यातीलच काहींच्या फितुरीमुळे संभाजी महाराज आणि कवी कलश मुघलांच्या ताब्यात गेले. औरंगजेबाने त्यांना अमानुष छळ दिला. त्यांच्या डोळ्यांसमोर अत्याचार करण्यात आले, शरीराचे हाल करण्यात आले, तरीही त्यांनी स्वाभिमान सोडला नाही. अखेर ११ मार्च १६८९ रोजी त्यांची क्रूर हत्या करण्यात आली. मात्र त्यांच्या बलिदानामुळे मराठ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आणि स्वराज्य अधिक बळकट झाले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे महत्त्व केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. त्यांनी दिलेला संदेश संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी आहे. संकटे कितीही मोठी असली तरी स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा यांचा त्याग करू नये, हे त्यांनी आपल्या जीवनातून दाखवून दिले. त्यांचे बलिदान हे भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले महान योगदान आहे.

संभाजी महाराज अत्यंत विद्वान, संवेदनशील आणि कुशल शासक होते. त्यांनी राज्यकारभारात शिस्त,



न्याय आणि प्रजेच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांनी शेतकरी, सैनिक आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष दिले.

संभाजी महाराजांच्या विद्वत्तेचा विचार केला तर ते त्या काळातील अत्यंत अभ्यासू राजांपैकी एक होते. त्यांनी संस्कृत साहित्याचा सखोल अभ्यास केला होता. ‘बुधभूषण’ या ग्रंथामध्ये त्यांनी राजकारण, नीतिशास्त्र आणि प्रशासन यांवर विचार मांडले आहेत. युद्धाच्या धामधुमीतही साहित्य आणि ज्ञान यांच्याशी त्यांची नाळ जोडलेली होती. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक व्यापक आणि प्रेरणादायी ठरते.

संभाजी महाराजांनी मराठा साम्राज्य टिकवून ठेवण्यात मोलाची भूमिका बजावली. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे रक्षण करणे हे अत्यंत कठीण काम होते. कारण मुघल साम्राज्य त्या काळी अत्यंत बलाढ्य होते. औरंगजेब स्वतः दक्षिणेत उतरला होता. अशा परिस्थितीत संभाजी महाराजांनी जवळपास नऊ वर्षे संघर्ष करत स्वराज्य टिकवून ठेवले. त्यांनी कधीही शत्रूपुढे शरणागती पत्करली नाही. त्यांच्या नेतृत्वामुळे मराठ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांनी औरंगजेबाला प्रखर प्रतिकार केला. संताजी घोरपडे, धनाजी जाधव आणि इतर मराठा सरदारांनी मुघल सैन्याला हैराण केले. अखेरीस औरंगजेबाचा दक्षिणेतील मोहिमेमध्ये पराभव झाला. यामागे संभाजी महाराजांनी निर्माण केलेली प्रेरणा आणि स्वराज्यनिष्ठा कारणीभूत होती.

छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन आजच्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. आजच्या काळात स्वार्थ, भौतिकता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास दिसून येतो. अशा वेळी संभाजी महाराजांचे जीवन आपल्याला राष्ट्रप्रेम, धैर्य, संघर्षशीलता आणि नीतिमूल्यांची जाणीव करून देते. त्यांनी संकटांना घाबरून न जाता त्यांचा सामना केला. त्यांनी परिस्थितीसमोर कधीही हार मानली नाही. हा संदेश आजच्या युवकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज महाराष्ट्रात आणि देशभरात संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. व्याख्याने, मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि इतिहास अभ्यास शिबिरे यांच्या माध्यमातून त्यांच्या कायार्ची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली जाते. अनेक युवक संघटना आणि सामाजिक संस्था त्यांच्या विचारांचा प्रचार करतात. मात्र केवळ जयंती साजरी करणे पुरेसे नाही. त्यांच्या विचारांचे आणि आदर्शांचे पालन करणे अधिक महत्त्वाचे आहे.

संभाजी महाराजांचा इतिहास हा केवळ युद्धांचा इतिहास नाही, तर तो संस्कृती रक्षणाचा इतिहास आहे. त्यांनी हिंदवी स्वराज्याच्या माध्यमातून सर्व समाजघटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांचे लोक होते. त्यांनी कधीही जातीय किंवा धार्मिक द्वेषाला प्रोत्साहन दिले नाही. न्याय, समानता आणि स्वराज्य हीच त्यांची भूमिका होती.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची कणखर निर्णयक्षमता. कठीण प्रसंगांमध्ये त्यांनी धैयार्ने निर्णय घेतले. युद्धभूमीवर ते स्वतः सैनिकांसोबत लढत असत. त्यामुळे सैनिकांमध्ये त्यांच्याविषयी विशेष आदर होता. राजा असूनही त्यांनी कधीही ऐषआरामाला प्राधान्य दिले नाही. त्यांचे जीवन संघर्ष आणि कर्तव्यनिष्ठेचे प्रतीक होते.

संभाजी महाराजांच्या काळात मराठा आरमारालाही महत्त्व होते. सिद्दी आणि पोतुर्गीज यांच्याविरुद्ध त्यांनी समुद्री संरक्षण मजबूत करण्याचा प्रयत्न केला. किनारपट्टीवरील किल्ले आणि व्यापार यांचे रक्षण करण्यासाठी त्यांनी उपाययोजना केल्या. यावरून त्यांच्या प्रशासनातील दूरदृष्टी स्पष्ट होते.

संभाजी महाराजांचे जीवन हे त्यागाचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांनी स्वतःच्या सुखाचा कधी विचार केला नाही. स्वराज्य आणि धर्मरक्षण हेच त्यांचे ध्येय होते. मृत्यू समोर असतानाही त्यांनी आपल्या तत्त्वांशी तडजोड केली नाही. त्यामुळे ते भारतीय इतिहासातील अमर वीर ठरतात. आजच्या काळात इतिहासाचे योग्य आकलन होणे अत्यंत आवश्यक आहे. इतिहास केवळ गौरवासाठी नसतो, तर तो वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी मार्गदर्शक असतो. संभाजी महाराजांचा इतिहास आपल्याला संघषार्तून उभे राहण्याची प्रेरणा देतो. त्यांनी संकटांना संधीमध्ये बदलले आणि स्वराज्य टिकवून ठेवले.

संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनातील मूल्यांचा विचार करणे गरजेचे आहे. राष्ट्रप्रेम, स्वाभिमान, कर्तव्यनिष्ठा, विद्वत्ता आणि धैर्य ही मूल्ये समाजात रुजली तरच त्यांना खरी आदरांजली ठरेल. आजच्या युवकांनी त्यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करून त्यातून प्रेरणा घ्यावी. मोबाईल आणि सामाजिक माध्यमांच्या आहारी जाण्याऐवजी इतिहासातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवणे आवश्यक आहे.

छत्रपती संभाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान आहेत. त्यांचे बलिदान भारतीय संस्कृतीच्या रक्षणासाठी दिलेले महान योगदान आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी राष्ट्रहित, सामाजिक एकता आणि नैतिक मूल्ये जपण्याचा संकल्प केला पाहिजे.

मराठ्यांच्या इतिहासातील तेजस्वी पर्व म्हणून संभाजी महाराजांचे नाव सदैव स्मरणात राहील. त्यांचे जीवन संघषार्चे, शौयार्चे आणि अटळ निष्ठेचे प्रतीक आहे. त्यांनी दाखवून दिले की कोणतेही संकट मनुष्याच्या आत्मबलापुढे मोठे नसते. अन्यायाविरुद्ध उभे राहणे, सत्यासाठी लढणे आणि राष्ट्रासाठी बलिदान देणे हेच खरे जीवनमूल्य आहे.

आजही महाराष्ट्रातील गड-किल्ले संभाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देत उभे आहेत. प्रत्येक किल्ला त्यांच्या संघषार्ची कहाणी सांगतो. त्यांच्या स्मृती आजही जनमानसात जिवंत आहेत. गावागावांतून त्यांच्या जयंतीनिमित्त उत्साह दिसून येतो. युवकांच्या मनात त्यांच्याविषयी विशेष आकर्षण आणि आदर आहे.

संभाजी महाराजांचे विचार समाजाला एकत्र आणणारे आहेत. त्यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष केला, पण कधीही मानवतेचा त्याग केला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शौर्याबरोबरच संवेदनशीलताही होती. प्रजेच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. त्यामुळे ते लोकाभिमुख राजा म्हणूनही ओळखले जातात.

छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांचे कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी त्यांच्या जीवनावर आधारित अभ्यास, व्याख्याने आणि उपक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. इतिहासाचे योग्य ज्ञान मिळाल्यास युवकांमध्ये राष्ट्रप्रेम आणि सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण होईल.

छत्रपती संभाजी महाराजांचे जीवन हे एका जाज्वल्य राष्ट्रभक्ताचे जीवन होते. त्यांनी स्वतःच्या प्राणांची पर्वा न करता स्वराज्याचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे मराठा साम्राज्य अधिक मजबूत झाले आणि पुढे पेशव्यांच्या काळात मराठ्यांनी दिल्लीपर्यंत झेंडा फडकवला. त्यामुळे संभाजी महाराजांचे योगदान मराठा साम्राज्याच्या विस्तारामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे.

त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य केले पाहिजे. भ्रष्टाचार, अन्याय, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांच्या जीवनातून मिळते. स्वाभिमानी, चारित्र्यसंपन्न आणि राष्ट्रनिष्ठ नागरिक घडविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

छत्रपती संभाजी महाराज हे भारतीय इतिहासातील अजरामर व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे शौर्य, विद्वत्ता आणि बलिदान यामुळे ते सदैव जनमानसात जिवंत राहतील. १४ मे रोजी साजरी होणारी त्यांची जयंती ही केवळ उत्सव नसून प्रेरणेचा आणि स्वाभिमानाचा दिवस आहे. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करताना आपण त्यांच्या आदर्शांचे पालन करण्याचा निर्धार केला पाहिजे. राष्ट्र आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी आवश्यक असलेली जिद्द, धैर्य आणि निष्ठा यांचे तेजस्वी उदाहरण म्हणून छत्रपती संभाजी महाराजांचे नाव भारतीय इतिहासात सदैव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

पान १ वरून

## मंत्री-अधिकाऱ्यांचे विदेश दौरे रद्द...

आवाहनाला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दोन उच्चस्तरिय बैठकीत विविध उपाययोजनांचा आढावा घेतला आणि त्यानुसार काही निर्णय जाहीर केले. या बैठकांना मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं देशातील जनतेला महत्त्वाचं आवाहन**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या जनतेला जागतिक तेल संकटाच्या पार्श्वभूमीवर मोलाचं आवाहन केलं आहे. मध्य पूर्वेत सुरु असलेल्या संघर्षामुळे हार्मुझची सामुद्रधुनी बंद झाली आहे. भारताला तेल पुरवठा केल्या जाणाऱ्या देशांमधून येणारी जहाजे याच सामुद्रधुनीतून प्रवास करत भारताच्या दिशेला यायची. पण ही सामुद्रधुनी आता युद्धामुळे बंद असल्याने जगात तेलाचे भाव भडकले आहेत. परिणामी तेलच्या किंमतीत वाढ होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत तेल खरेदी करण्यासाठी भारताचे परकीय चलन जास्त खर्च होत आहे. यामुळे देशाचं परकीय चलन वाचवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाच्या जनतेला महत्त्वाचं आवाहन केलं आहे.

देशाचं परकीय चलन वाचावे यासाठी नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला वर्षभर सोने खरेदी करु नये असं आवाहन केलं आहे. यासोबतच पेट्रोल आणि डिझेलचा वापर काळजीपूर्वक आणि काटकसरीने करण्याचं आवाहन मोदींनी केलं आहे. इंधनावर चालणाऱ्या वाहनांच्याऐवजी इलेक्ट्रिक गाड्या वापरण्याचं आवाहन मोदींनी केलं आहे. यासोबतच खासगी वाहनांच्या ऐवजी मेट्रो आणि इलेक्ट्रिक बसने प्रवास करण्याचं आवाहन मोदींनी केलं आहे. सार्वजनिक वाहतुकीचे वाहन वापरण्याचं आवाहन मोदींनी केलं आहे. यासोबतच वर्क फ्रॉम होम काम करण्याचं आवाहन मोदींनी केलं आहे.

# सोलापूर महापालिकेत दर सोमवारी ‘नो व्हेईकल डे’ साजरा करण्याची मागणी

## नगरसेविका श्रद्धा पवार यांचे महापौर, सभागृहनेते व आयुक्तांना पत्र; पर्यावरण संरक्षणासाठी पुढाकार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पर्यावरण संरक्षण, इंधन बचत आणि वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेत दर सोमवारी ‘नो व्हेईकल डे’ साजरा करण्यात यावा, अशी मागणी प्रभाग क्रमांक ७-बच्या नगरसेविका सौ. श्रध्दा किरण पवार यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापौर, सभागृहनेते आणि महापालिका आयुक्त यांना अधिकृत पत्र देत महापालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचारी, नगरसेवक आणि नगरसेविकांनी प्रत्येक सोमवारी वाहनांचा वापर टाळून पर्यावरणपूरक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

नगरसेविका श्रद्धा पवार यांनी दिलेल्या पत्रात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत जीवनशैलीच्या संदेशाचा उल्लेख केला आहे. ‘पर्यावरण रक्षण ही काळाची गरज असून, शासकीय यंत्रणांनीच यामध्ये पुढाकार घेतला पाहिजे,’ असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.



सध्या शहरांमध्ये वाढती वाहनसंख्या, इंधनाचा वाढता वापर आणि त्यामुळे निर्माण होणारे वायू प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे. अशा परिस्थितीत आठवड्यातून एक दिवस वाहनमुक्त उपक्रम राबविल्यास पर्यावरण संवर्धनाला हातभार लागेल, तसेच नागरिकांमध्ये जनजागृतीही होईल, असा विश्वास श्रद्धा पवार यांनी व्यक्त केला आहे.


महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी आणि लोकप्रतिनिधींनी खासगी वाहनांऐवजी सार्वजनिक वाहतूक, सायकल किंवा पायी प्रवासाचा पर्याय स्वीकारल्यास समाजासमोर सकारात्मक संदेश जाईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

या उपक्रमाबाबत महापौर, सभागृहनेते आणि महापालिका आयुक्त यांनीही सकारात्मक भूमिका घेत सहमती दर्शवल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आगामी काळात सोलापूर महानगरपालिकेत अधिकृतपणे ‘नो व्हेईकल डे’ राबविण्याचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

पर्यावरणपूरक सवयी अंगीकारण्यासाठी आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी देशभरात विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. त्याच पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेचा हा प्रस्ताव महत्त्वाचा मानला जात आहे. ‘सरकारी यंत्रणांनी स्वतःपासून बदलाची सुरुवात केली तरच नागरिकही प्रेरित होतील,’ अशी प्रतिक्रिया पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त होत आहे.

दर सोमवारी ‘नो व्हेईकल डे’ उपक्रम प्रत्यक्षात राबविला गेला, तर तो सोलापूर शहरासाठी पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## दिल्लीवाला बाबा वदला, चला पटापट सवयी बदला



पेट्रोल-डिझेलचा झाला तुटवडा,
सोन्याचा तर सोडाच मोह सगळा.
नकोच आता परदेशवारी,
अर्थव्यवस्था पडली आजारी.
शेतकरी झाला कर्जबाजारी,
बेरोजगार तरुणाई दारोदारी.
तेल कंपन्यांनी भरल्या तुंबड्या,
तोटा होताच मागा आमच्या दमड्या.
अमेरिकेच्या हाती दिल्या नाड्या,
आम्हाला मात्र देशभक्तीच्या पुड्या.
धर्माचा झेंडा, जातीचा दांडा,
सत्तेसाठी सुरू नवा फंडा.
निवडणुकांआधी रेवड्यांचा पूर,
नंतर मात्र आर्थिक संकटाचा सूर.
वर्क फ्रॉम होम, नोकऱ्यांची कपात,
कुणी जात्यात तर कुणी सुपात.
१२ वर्षांचा मनमानी कारभार
जनतेने का सोसावा भार
आठवा — ‘बस हुई महंगाई की मार...’
अब की बार...
देशभक्तीच्या नावाखाली
तोंड दाबून बुक्क्यांचा मार!

**- डॉ. अमोल रामसिंग कोल्हे**

## शिवतेज पुरंदर



"आई जगदंबेच्या कृपाशीवार्दाने
शंभू रायरेश्वराच्या कृपादृष्टीने "

शिव-सईच्या पोटी पुत्र असा जन्मला गुंडा,
शिव-स्वराज्यासाठी त्रिलोकी त्याचा झेंडा...

शंभू तुझ्या येण्याने पृथ्वी ही हसली...
शंभू तुझ्या स्पर्शाने धरणी ही तळपली...

शंभू तुझ्या तेजाने गंगा अजून पवित्र झाली,
शंभू तुझ्या तेजाने भीमा नव्याने जगा उद्धारली...
शंभू तुझ्या तेजाने चंद्रभागा वारकऱ्यांनी भगवी झाली...

क्षितिजावर तेजाने अभिर गुलाल उधळले,
सूर्याने भाळावर तेज कोरले,
चंद्राने ही शीतल तेज घेतले,

शिवशंभू च्या जन्माष्टमीची मांगल्य सुरवात झाली,
पहाटेची भूपाळी तेजाने गायली,
सुगंधाची कस्तुरी तेजाने दरवळली,
भगव्याची पताका अजून तेजाळली

सूर्याचे तेज पुरंदराने पहिले,
साक्षात महादेवाचे दर्शन घेतले,
शिवतेजाचे स्वरूप जन्माला आले,
रयतेने देखणे सत्य अनुभवले,
"शिव-छत्रपतींचे पुत्र शंभू राजे शोभले"

जन्माचा देखणा सोहळा पुरंदराने डोळ्यात भरला...
आज माझा शंभू राजा सिंहासनाधिश्वर झाला..

**मयुरी विश्वनाथ बाबर**
9112443343

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अकलूज येथे शासकीय वसतिगृह 26 वर्षांपासून भाडेतत्वावरच

## 'कधी होणार हक्काची इमारत, कधी संपणार प्रदीर्घ वनवास'

**अकलूज (विलास गायकवाड):-** सामाजिक न्याय विभागांतर्गत चालवले जाणारे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मा. मुलांचे शासकीय वसतिगृह अकलूज येथे, गेल्या २६ वर्षापासून भाडेतत्वावर चालवले जात असून,कधी होणार स्वतःच्या हक्काची इमारत, कधी संपणार प्रदीर्घ काळाचा वनवास असे म्हणण्याची वेळ मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर आली आहे.

गरिबीच्या दाहकतेत होरपळत असतानाही,शिक्षणाच्या जोरावर आई - बापाचे स्वप्न साकार करण्यासाठी, अहोरात्र ज्ञानाच्या सान्निध्यात स्वतःला विलीन करणारे विद्यार्थी, शिक्षणाला अधिक महत्व देत असतात, म्हणूनच ते पुढे जाऊन यशाचे शिखर सर करत असतात. कारण त्यांच्या केंद्रस्थानी फक्त आणि फक्त शिक्षण असते.

अकलूज या गावाने आशिया खंडात,आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.सोलापूर जिल्ह्यात नसतील, एवढ्या मोठ्या प्रमाणात अकलूजमध्ये शिक्षणाचे साम्राज्य उभे आहे.राज्याच्या पंचक्रोशीतील विद्यार्थी, शिक्षण घेण्यासाठी अकलूज येथे येतात.ज्यांच्याकडे बऱ्यापैकी पैसा आहे ते विद्यार्थी रूम किंवा खासगी वसतिगृहाचा मार्ग निवडतात! परंतु जे जन्मजात गरिबीच्या जात्यात भरडले गेले आहेत अशा विद्यार्थ्यांना, तारेवरची कसरत करत शिक्षण घ्यावे लागत आहे.

गेले 26 वर्षे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मा.मुलांचे शासकीय वसतिगृह, अकलूज सारख्या ठिकाणी भाडेतत्वावर चालवले जात आहे ही एक शोकांतिका म्हणावे लागेल?

एक लाखाहून अधिक भाडे देऊन, अकलूज ग्रामीण रुग्णालयाच्या पाठीमागे, मोडकळीस आलेल्या एका मंगल कार्यालयात,शासकीय वसतिगृह 15 वर्षे सुरू होते.त्याच्याच शेजारी 4,5 फुटाच्या भिंती पलीकडे शवविच्छेदन गृह होते.मंगल कार्यालयाच्या ज्या मजल्यावर शासकीय वसतिगृह सुरू होते, तेथील खिडकीतून भयानक, भयावह दृश्य, विद्यार्थ्यांच्या दृष्टीस पडत होते. रात्र,रात्र विद्यार्थी जागे राहत होते. भय,भीती, दडपण आणि अभ्यासापासून दुरावा निर्माण करणारे हे ज्वलंत वास्तव समोर असतानाही,अभ्यासाची गती त्यांची कमी झाली नाही!

समोर धडकी भरेल अशी परिस्थिती असतानाही, अधीक्षक यांनी ठिकाण बदलले नाही.कारण तेच सांगू शकतील?

यामुळे काही विद्यार्थ्यांच्या शिक्षणावरही परिणाम झाले असतील तर काही विद्यार्थी वसतिगृह सोडून गेले असतीलही.!

नंतर सर्व स्तरातून सदर वसतीगृहाच्या विरुद्धमध्ये उठाव होत होते, कदाचित याच कारणास्तव, दीड वर्षापूर्वी मंगल कार्यालयातून,शासकीय वसतिगृह स्थलांतरित करण्यात आले असावे. ते आता मसुदमळा ते माळेवाडी बायपास रोड येथे, एक लाख चाळीस हजार रुपये भाडे देऊन, नलवडे कॉम्प्लेक्स मध्ये चालवले जात आहे.

ज्ञान ग्रहण करणारा विद्यार्थी गरीब असो किंवा श्रीमंत असो उद्भवलेल्या संकटांचा सामना करत तो शिक्षण घेत असतो.मग तो घरी असो अथवा वसतिगृहात असो!असे जरी असले तरी लवकरात लवकर अकलूज येथे शासकीय वसतिगृह, स्वतःच्या हक्काचे असावे असे अनेक मा.विद्यार्थी बोलत आहेत.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग हे देत आहे...

परंतु एक हक्काचे वसतिगृह देऊ शकत नाही?*

१) शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजनात गहू/बाजरी/ ज्वारी/तांदूळ //डाळ /भाजीपाला/ कंद भाजी इत्यादी आहाराचा पुरवठा अमर्यादित (पोटभर) करण्यात यावा.

२) नाश्त्यासाठी विद्यार्थ्यांना उसळ/पोहे/उपमा/शिरा यापैकी एक दुध (साखरेसह) २ अंडी (उकडलेली) दररोज व शाकाहारी मुलांसाठी कोर्नफ्लेक्स (सिरीयल), १ सफरचंद, १ सिझनेबल फळ (ऋतुमाना प्रमाणे मिळणारे)

३) चिकन /मटन दर आठवड्याला ५०० ग्राम प्रतिविद्यार्थी प्रमाणे आठवड्यातून दोनदा, प्रतिविद्यार्थी २५० गरम प्रमाणे भात/पुलाव सलाड सह

४) शाकाहारी विद्यार्थ्या करिता प्रत्येक वेळी २ भाजी, वरण व दही, भात व एक गोड पदार्थ (स्वीट) आठवड्यातून २ वेळा

५) दररोज प्रत्येक जेवणात आवश्यक तेवढे कांदा, लिबू, लोणचे, पापड सलाड व ५० ग्राम गावरान तूप (दर आठवड्याला)

६) कंत्राटदाराची निवड २ पाकीट लिलाव पद्धतीनुसार करावी व अनुभवी व नामांकित कंत्राटदार असावा.

७) निर्वाह भत्ता (प्रतिमाह) - विभागीय स्तर रु ८००/-

प्रत्येकी जिल्हा स्तर रु ६००/- प्रत्येकी तालुका स्तर रु ५००/- प्रत्येकी

८) शालेय गणवेश रु ५०० प्रमाणे प्रत्येकी २ जोड दर वर्षी



९) महाविद्यालयीन स्तर जेथे ड्रेस कोड असेल तेथे प्रती विद्यार्थी रु १०००/- प्रमाणे २ जोड.

१०) वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी अप्रण करिता रु ५००/-प्रती विद्यार्थी दरवर्षी.

११) वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यानंतर लगेच वैद्यकीय साहित्यसाठी रु १०००/- प्रती विद्यार्थी, वैद्यकीय शाखेसाठी स्टेथो स्कोप साठी रु १०००/- व इतर साहित्यासाठी रु १०००/- असे एकूण २०००/- प्रती विद्यार्थी दरवर्षी

१२) अभियांत्रिकी विद्यार्थी करिता बॉयलर सूट करिता प्रतिवर्षी प्रती विद्यार्थी रु ५००/-

१३) अभियांत्रिकी पदवी पदविका विद्यार्थ्या करिता ड्रो इंग बोर्ड व इतर साहित्यासाठी प्रती विद्यार्थी रु ५००/- दरवर्षी.

१४) लब अप्रण करिता रु ५००/- प्रतिविद्यार्थी दर वर्षी १५) शारीरिक शिक्षण महाविद्यालय २ गणवेश करिता रु ४०००/- प्रती विद्यार्थी दर वर्षी.

१६) छत्री/रेनकोट व गमबूट दरवर्षी रु ५००/- प्रमाणे प्रती विद्यार्थी

१७) कला शाखेतील चित्रकला, संगीत व इतर पदवी/पदविका तसेच विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्या साठी आवश्यक असलेले साहित्यासाठी रु ४०००/- दर वर्षी प्रती विद्यार्थी.

१८) शैक्षणिक सहली करिता प्रत्येकी रु. २०००/- दर वर्षी प्रती विद्यार्थी

१९) शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्या करीता दर वर्षी कार्यशाळे करिता रु. ५००/- प्रती विद्यार्थी

२०) प्रोजेक्ट रिपोर्टसाठी प्रति विद्यार्थी रु. १०००/- प्रती प्रकल्प (शासकीय वसतीगृहांसाठी)

२१) स्नेह संम्मेलन/करमणुक व्यवस्थेसाठी प्रति शासकीय वसतिगृह रु. २५०००/- दरवर्षी (साऊंड सिस्टीम साहित्य व इतर खर्चासाठी)

२२) क्रीडा वस्तु खरेदीसाठी प्रति शासकीय वसतिगृह रु. १०.०००/- दरवर्षी (शासकीय वसतीगृहांसाठी)

२३) प्रत्येक शासकीय वसतिगृहासाठी एक कलर टी. व्ही. ४० ते ५० इंची स्क्रीन चा खरेदी करता येईल तसेच वैज्ञानिक अथवा संशोधनात्मक चॅनल करिता डिश ॲन्टीना व पेड चॅनल करिता रु. १०,०००/- प्रति वर्ष प्रति वसतिगृह.

२४) प्रत्येक शासकीय वसतिगृहासाठी अ क्वॉगार्ड व वॉटर कुलर देण्यात यावे. पाणी साठविण्यासाठी पुरेशी व्यवस्था करावी तसेच वार्षिक देखभालीचा वार्षिक देखमाल करार (ए.एम. सी.) पुरवठादार यांचे सोबत करावा.

२५) प्रत्येक शासकीय वसतिगृहात फायर फायटींग सुविधा लागू करावी. तसेच देखभालीचा वार्षिक देखभाल करार (ए.एम. सी.) पुरवठादार यांचे सोबत करावा.

२६) शासकीय वसतिगृहामध्ये १० विद्यार्थ्यांसाठी एक संगणक, इंटरनेट सुविधेसह उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच एका वसतिगृहासाठी एक प्रिंटर खरेदी करावे. तसेच वार्षिक देखभालीचा वार्षिक देखभाल करार (ए.एम. सी.) पुरवठादार यांचे सोबत करावा.

२७) केंद्र शासनाच्या अनुसूचीत जाती शिष्यवृत्तीसाठी जी उत्पन्न मयार्दा आहे ती उत्पन्न मयार्दा शासकीय व अनुदानित वसतीगृहातील विद्यार्थी प्रवेशासाठी ठेवावी तसेच केंद्र शासन ज्या ज्या वेळी त्यात सुधारणा करेल त्या सुधारणा आपोआप लागु होतील.

२८) सर्व शासकीय वसतिगृहांमध्ये ६ महिन्यातून एकदा पेस्ट कंट्रोल करण्यात यावे. तसेच शासकीय वसतिगृहामध्ये इन्व्हर्टरची व्यवस्था करावी. त्याच प्रमाणे सोलर उजेर्ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी व देखभाली करीता पुरवठादारासोबत वार्षिक करार (ए.एम.सी.) व्हावा. २९) सर्व वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा राजीव गांधी विमा योजने अंतर्गत शासनामार्फत विमा काढावा.

३०) सर्व शासकीय वसतिगृहांमध्ये अद्ययावत ग्रंथालय असावे व त्यासाठी स्वतंत्र कक्ष असावा ग्रंथालयामध्ये आवश्यक सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध करावी. त्याकरिता स्पर्धा परीक्षेसाठी दरवर्षी रु. २.०० लाख प्रति वसतिगृह खर्च अनुज्ञेय राहील. ग्रंथालयामध्ये एल.सी.डी. संगणक इंटरनेटसह आवश्यक सर्व प्रकारचे फर्नीचर व ई-लायब्ररीच्या सर्व सुविधा असाव्यात तसेच वर्तमान पत्रे मराठी आणि शिक्षण उपयोगी मासिके त्यामध्ये प्रामुख्याने सामान्य ज्ञान, स्पर्धा, परिक्षा, मार्गदर्शन, चालू घडामोडी बाबत अंक इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेतील असावेत.

३१) वषार्तून दोनदा पालक सभा आयोजित करण्यात याव्यात याकरिता रु. १०,०००/- प्रति

३२) गृहपालाने विद्यार्थ्यांच्या शाळा कॉलेजात वषार्तून किमान दोनदा भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या समस्ये बाबत उपस्थिती बाबत, व अभ्यासक्रमातील प्रगती बाबत चर्चा करावी. व त्यानुसार उपाययोजना करावी.

३३) सर्व शासकीय वसतिगृहातील भिंतीवर व मोकळ्या जागी थोर समाजसुधारकांचे सुविचार लिहावेत. तसेच ग्रंथालयात भित्तीपत्रक चालवावेत त्यामध्ये विद्यार्थ्याच्या मार्फत कविता, लेख व इतर उत्कृष्ट नाविन्यपुर्ण सातित्य प्रकाशित करावे. सदर सुविचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत तयार करण्यात यावेत. सर्व शासकीय वसतीगृहांत पुरेशा प्रमाणात दीर्घकाळ टिकणारी नेक प्रजातीची झाडे लावण्यात यावीत.

३४) भारतीय राज्य घटनेच्या कलम ४६ नुसार उपरोक्त १ ते ३४ मुद्यांचा निधी अनु. जातीच्या कल्याणासाठी या योजनेची अंमलबजावणी करताना कंत्राट अथवा ठेका देताना अनुजातीच्या सहकारी संस्था, इतर संस्था व अनुजातींच्या महिलांचे बचत गट व अनु. जातीच्या व्यक्तींना प्रथम प्राधान्य द्यावे.

३५) शासकीय वसतिगृहातील सर्व मुला/मुलींना १० दिवसांच्या विपश्यना प्रशिक्षणाकरिता योग्य वेळेनुसार सोईच्या ठिकाणी पाठविण्यात यावे. यासाठी होणारा खर्च मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३६) सदर शासन निर्णयात / नियमात दर पाच वर्षांनी अद्ययावत सुधारणा

# पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे १५ मे रोजी आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांच्या विद्यमाने जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी शुक्रवार, दि. १५ मे २०२६ रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सोलापूर जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला असून, विविध नामांकित उद्योजक व कंपन्यांकडून एकूण १४६ पेक्षा अधिक रिक्त पदांची ऑनलाईन अधिसूचना करण्यात आलेली आहे. या रोजगार मेळाव्यामध्ये ओ.पी.डी. एक्झीक्युटीव्ह, कॅशलेस एक्झीक्युटीव्ह, विलींग, डाटा एन्ट्री, बीमा सखी, सेल्स, कामगार, ट्रेनी, लॅब केमिस्ट, सेल्स ऑफिसर, एचआर, बँक ऑफिस, अकाऊंटंट, अप्रेंटिसशिप, रिसेप्शनिस्ट, टेलीकॉलर, सेल्स अँण्ड सर्व्हिस, वेल्डर, फिटर, पेंटर, हेल्पर, सी. एन.सी./व्ही.एम.सी. ऑपरेटर, प्रोग्रामर, ड्रिलर, टूल अँण्ड डाय मेकर, क्वालिटी, प्रेस टूल डिझायनर, टर्नर तसेच वैद्यकीय क्षेत्रातील इ.रू. नर्सिंग, डी-फार्म, ओटी टेक्निशियन, पॅरामेडिकल, एक्स-रे टेक्निशियन, GNM, ANM, DMLT, MLT, PGDMLT आदी पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सदर पदांसाठी १० वी, १२ वी, बी. एस्सी., बी.ई., आयटीआय, सी. एन.सी./व्ही.एम.सी. ऑपरेटर, डिप्लोमा, ग्रॅज्युएट आदी शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. नोकरी इच्छुक उमेदवारांनी आपल्या रिज्युमेच्या तीन प्रती व आवश्यक कागदपत्रांसह शुक्रवार, दि.१५ मे २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट पार्क चौक, सोलापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक ०२१७-२९९२९५६ वर संपर्क साधावा अथवा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट पार्क चौक, सोलापूर येथे प्रत्यक्ष भेट द्यावी. तसेच अधिक माहितीसाठी महास्वयं रोजगार पोर्टलला भेट द्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त कौशल्य विकास राजगार व उद्योजकता, सोलापूर संगीता खंदारे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

# ज्ञानभारतम प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारताला हस्तलिखितांचा अत्यंत समृद्ध व मौल्यवान वारसा लाभलेला असून पारंपारिक ज्ञान, संस्कृती, तत्त्वज्ञान, विज्ञान, साहित्य आणि अध्यात्म यांचा वारसा पिढ्यान पिढ्या हस्तलिखितांच्या माध्यमातून जतन व प्रसारित होत आला आहे. ही हस्तलिखिते देशभरातील विविध संस्था, मठ, मंदिरे, ग्रंथालये तसेच खाजगी संग्राहकांकडे विखुरलेल्या स्वरूपात उपलब्ध आहेत. या अमूल्य ज्ञानसंपदेचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयामार्फत 'ज्ञानभारतम' (Gyan Bharatam) हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत देशव्यापी हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला दिनांक १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये घोषित करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या माध्यमातून भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह (National Digital Repository) निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे. हस्तलिखितांची मालकी संबंधित संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांच्याकडेच राहणार असून, स्वखुशीने हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द करण्याची इच्छाही संबंधितांना व्यक्त करता येणार आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांची महत्त्वपूर्ण भूमिका असून राज्यातील विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यात या प्रकल्पासाठी खालील संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत: कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर - क्लस्टर केंद्र, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे,- क्लस्टर केंद्र आनंद आश्रम संस्थान, पुणे, स्वतंत्र केंद्र, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे - स्वतंत्र केंद्र महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य नोडल अधिकारी म्हणून सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय कार्य पाहणार असून सहनोडल अधिकारी म्हणून अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था तथा अभिजात मराठी भाषा कक्षा, मराठी भाषा विभाग या कार्यरत राहणार आहेत. सदर सर्वेक्षणासाठी 'Gyan Bharatam' हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यात ज्ञानभारतम प्रकल्पासाठी जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, NCC, NSS स्वयंसेवक, विद्यार्थी तसेच वारसा संवर्धन संस्था यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नागरिकांकडे उपलब्ध असलेली हस्तलिखिते 'Gyan Bharatam' मोबाईल ॲपवर नोंदवून या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# चार श्रम संहितांविरोधात सिटूचे जोरदार निदर्शने

## शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करून केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सिटू) जिल्हा समिती, सोलापूरच्या वतीने केंद्र सरकारने लागू करू पाहणाऱ्या चार श्रम संहितांविरोधात राज्यव्यापी आंदोलनाची हाक देण्यात आली. त्या अनुषंगाने सोलापूर येथे सिटूचे राज्य महासचिव कॉ. एम. एच. शेख आणि राज्य उपाध्यक्ष युसुफ शेख मेजर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषद पुनम गेट येथे जोरदार निदर्शने करण्यात आली. यावेळी शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करून केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांचा निषेध करण्यात आला.



यावेळी कार्यकर्त्यांनी 'चार श्रम संहिता रद्द करा', 'कामगार कायदे पायदळी तुडवणाऱ्या केंद्र सरकारचा धिक्कार असो', 'मोदी सरकार की तानाशाही नहीं चलेगी', 'इंकलाब जिंदाबाद', 'कामगार एकता जिंदाबाद' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

यावेळी मार्गदर्शन करताना कॉ. एम. एच. शेख म्हणाले की, चार श्रम संहितांच्या माध्यमातून केंद्र सरकार देशातील कामगारांचे दशकानुदशके संघषार्तून मिळवलेले हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न करत आहे. 'हायर अँड फायर' धोरणाला कायदेशीर संरक्षण देऊन कायमस्वरूपी रोजगार धोक्यात आणला जात असून संपाच्या अधिकारावर निर्बंध घालून कामगारांचा लोकशाही संघर्ष कमकुवत केला जात आहे.

ते पुढे म्हणाले की, महागाई, बेरोजगारी आणि कंत्राटीकरण वाढत असताना कामगारांना सामाजिक सुरक्षा, हमी वेतन आणि सुरक्षित रोजगार देण्याऐवजी कॉर्पोरेट हितसंबंध जपले जात आहेत. चार श्रम संहितांमुळे असंघटित, कंत्राटी, गिग आणि प्लॅटफॉर्म कामगार अधिक असुरक्षित होतील, अशी टीकाही त्यांनी केली.

सिटूच्या वतीने चारही श्रम संहिता रद्द कराव्यात, सर्व कामगारांना सन्मानजनक किमान वेतन लागू करावे, संघटना व संपाच्या अधिकाराचे संरक्षण करावे, ठेका पद्धतीला आळा घालावा तसेच सर्व कामगारांना सामाजिक सुरक्षा कायदेशीर हक्क म्हणून द्यावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

यावेळी कॉ. एम. एच. शेख, नसीमा शेख, नलिनीताई कलबुर्गी, व्यंकटेश कोंगारी, मुरली सुंचू, डी. रमेशबाबू आदींनी सभेला संबोधित केले.

हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी दाऊद शेख, नरेश दुगाने, विक्रम कलबुर्गी, बालाजी तुम्मा, नरसिंग बुगले, रफिक काझी, बापू साबळे, आप्पाशा चांगले, वसीम मुल्ला, राजेंद्र गेंट्याल, वीरेंद्र पद्मा, विजय हरसुरे, बालकृष्ण मल्याळ, शिवा श्रीराम, बालाजी गुंडे, प्रवीण आडम, प्रकाश कुऱ्हाडकर, अंबादास बिंगी, किशोर मेहता आदींनी परिश्रम घेतले.

कॉ.विल्यम ससाणे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कॉ. ॲड. अनिल वासम यांनी केले.

# शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर खा. प्रणिती शिंदे आक्रमक

## जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील आणि लोकसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत खासदार प्रणिती शिंदे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात मा. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांची शेतकरी शिष्टमंडळासह भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यामध्ये सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पीक विमा नुकसान भरपाई, खरीप २०२३ मधील वंचित शेतकऱ्यांच्या मंजूर विमा रकमेचे वितरण तसेच सीना नदीमध्ये भीमा कोळेगाव धरणातून पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली.

खासदार प्रणिती शिंदे यांनी निवेदनात म्हटले आहे की, सन २०२५ मध्ये शासनाने कांदा, सोयाबीन, भुईमूग आणि तूर ही चार पिके पीक विम्यासाठी निर्देशित केली होती. सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या पिकांचा मोठ्या प्रमाणावर पीक विमा भरला असतानाही विमा कंपन्यांनी केवळ कांदा पिकासाठीच २५ टक्के विमा मंजूर करून शेतकऱ्यांवर अन्याय केला आहे. उत्तर सोलापूर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात सरासरीपेक्षा दुप्पट पाऊस होऊनही सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना विमा नाकारण्यात आल्याने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून विमा कंपन्यांनी चुकीचे निकष लावून नुकसान भरपाई टाळण्याचा प्रयत्न केल्याचा आरोपही खासदार शिंदे यांनी केला. शेतकऱ्यांना १०० टक्के नुकसान भरपाई देण्यात यावी, अन्यथा शेतकऱ्यांसोबत मोठे आंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला.

तसेच खरीप हंगाम २०२३ मध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या आणि तांत्रिक कारणांमुळे पीक विम्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांचा प्रश्नही खासदार शिंदे यांनी उपस्थित केला. तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी विमा मंजूर करण्याचे आदेश दिल्यानंतरही



अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप विमा रक्कम जमा झालेली नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. आगामी शेती हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि शेती साहित्य खरेदीसाठी तातडीने आर्थिक मदतीची गरज असल्याने विमा कंपनीस तत्काळ आदेश देण्याची मागणी करण्यात आली.

याशिवाय सीना नदीमध्ये भीमा कोळेगाव धरणातून पाणी सोडण्याबाबतही निवेदन देण्यात आले. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे भीमा कोळेगाव धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग करण्यात आल्याने म्हाडा, मोहोळ, उत्तर सोलापूर आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात महापूर येऊन शेती, जनावरे आणि नागरिकांचे मोठे नुकसान झाले होते. अनेकांचे पुनर्वसन अद्यापही प्रलंबित असल्याचे सांगत आता उन्हाळ्यात सीना नदी कोरडी पडल्यामुळे नदीकाठच्या गावांतील शेतकऱ्यांसाठी पाणी सोडणे अत्यावश्यक असल्याचे खासदार शिंदे यांनी नमूद केले.

यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित प्रश्नांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

दरम्यान, खासदार प्रणिती शिंदे यांनी शेतकरी हिताला प्राधान्य देत पीक विमा, पाणी आणि नुकसान भरपाईसारखे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, अशी मागणी केली. शेतकऱ्यांचे हक्काचे पाणी आणि विमा मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असून ग्रामस्थ आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष भारत जाधव, सचिन गुंड, जिल्हा समन्वयक मनोज यलगुलवार, प्रवीण भोसले, अमोल सलवदे, विकास राठोड, पुष्कराज भोसले, चेतन इंगळे, सोमनाथ भोसले, दादासाहेब भोसले, बालाजी जगताप, रुकमा गुंड, हणमंत जावीर, दयानंद पवार, निलेश गुंड, विष्णू भोसले, संदीप सुरवसे, विशाल वाघमारे, हणमंतू जगताप, प्रदीप भोसले यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माळशिरस तालुक्यातील २१ वस्त्यांना दिलासा; दररोज टँकरने पाणीपुरवठा होणार

**माळशिरस (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील पळसमंडळ, सुळेवाडी आणि पिंपरी या गावांमध्ये निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

या तीन गावांना दररोज एकूण १ लाख ९९ हजार १९९ लिटर पाण्याचा पुरवठा केला जाणार असून, संबंधित टँकर गावांकडे



रवाना करण्यात आल्याची माहिती पंचायत समितीचे पाणीपुरवठा उपअभियंता जे. व्ही. सदावरे यांनी दिली.यावेळी शाखा अभियंता ए. एन. आंबले, जे. व्ही. घोळवे, वरिष्ठ सहायक एस. आर. करांडे तसेच सहायक स्थापत्य अभियंता एस. आर. मोरे उपस्थित होते.पळसमंडळ गावातील फडतरी वस्ती, चव्हाण वस्ती, माने-साळुंखे वस्ती, पाडुळे-भाळे वस्ती, करेवस्ती आणि शिंदे-वाघमोडे वस्ती या सहा वस्त्यांसाठी २५ हजार लिटर क्षमतेच्या टँकरच्या दररोज चार खेपा होणार आहेत.तर सुळेवाडी येथील इरकर वस्ती आणि फुले वस्ती या दोन वस्त्यांसाठी १० हजार लिटर क्षमतेच्या टँकरच्या दररोज दोन खेपा नियोजित करण्यात आल्या आहेत.पिंपरी गावातील खडकमाळ, लक्ष्मीनगर, हरणटेक वस्ती, गायरान वस्ती, बाळूमामावाडी, बजबळकर वस्ती, उंबरदेव, बाड वस्ती, दत्तनगर, दत्ताडे वस्ती, राणे वाडी, लांडी वस्ती आणि कोथळवाट अशा १३ वस्त्यांसाठी २४ हजार लिटर क्षमतेच्या टँकरच्या दररोज तीन खेपा करण्यात येणार आहेत.